# खंड ४(१) (ब)(आठ) नमुना (अ)

## म.रा.मा.प.महामंडळ समितीची यादी

| अ क्र | समिता-चे नांव | समिती सदस्य | समिती उद्दीष्टे | किती वेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यां-साठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत (उपलब्ध) |
|---|---|---|---|---|---|---|
| **लेखा खाते** | | | | | | |
| १ | लेखा परिक्षण उप अधिकारी | समिती अध्यक्षांचा सदस्य संख्या ठरविण्याचा अधिकार आहे. | - | निश्‍चित कालावधी नाही. | जनसामान्यासाठी खुली नाही | अंतर्गत कामकाजा-साठी कार्यवृत्त उपलब्ध आहे. |
| | अध्यक्ष<br>सदस्य<br>सचिव | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक<br>वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी<br>मुख्य अंतर्गत लेखा परिक्षक | | | | |
| **कामगार शाखा** | | | | | | |
| १ | संयुक्त विचार विनिमय समिती (राज्यस्तरीय) | उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक-अध्यक्ष व व्यवस्थापनाचे खाते/शाखा प्रमुख.<br>तसेच<br>मान्यताप्राप्त संघटनेचे ९ प्रतिनिधी. | कामगारांच्या प्रश्‍नांचे निवारण करणे. | प्रत्येक ३ महिन्यातून एकदा | नाही | उपलब्ध |
| २ | संयुक्त विचार विनिमय समिती (घटक स्तरावरील) | महाव्यवस्थापक(क.व औ.सं.)<br>-अध्यक्ष कामगार अधिकारी(मुख्यालय) सचिव तसेच व्यवस्थापनाचे संबंधीत खाते/शाखा प्रमुख व<br>मान्यताप्राप्त संघटनेचे ७ प्रतिनिधी. | मध्यवर्ती कार्यालयातील व मध्यवर्ती भांडार येथील कामगारांच्या प्रश्‍नांचे निवारण करणे. | प्रत्येक २ महिन्यातून एकदा | नाही | उपलब्ध |
| ३ | कामगार कल्याण समिती | महाव्यवस्थापक(क.व औ.सं.)<br>कामगार अधिकारी(मुख्यालय)<br>सहाय्यक लेखा अधिकारी व मध्यवर्ती कार्यालयातील नामनिर्देशित कल्याण समितीचे सदस्य (४). | कामगार कल्याण विषयक क्रिडा,नाट्य, ग्रंथालय,उपहारगृह याबाबतच्या सुविधा-सोयी पहाणे. | प्रत्येक २ महिन्यातून एकदा | नाही | उपलब्ध |
| | | | | | | |

| भांडार व खरेदी खाते | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | निविदा व भांडार समिती | १) रा.प.महामंडळाचे अध्यक्ष-अध्यक्ष<br>२) अतिरिक्त मुख्य सचिव (परिवहन) - सदस्य<br>३)परिवहन आयुक्त-सदस्य<br>४) उपाध्यख व व्यवस्थापकीय संचालक-सदस्य<br>५)वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी-सल्लागार<br>६)महाव्यवस्थापक (यांत्रिकी)/उपभोक्ता खाते प्रमुख-सह सचिव<br>७) मुख्य स्थापत्य अभियंता-सह सचिव<br>८)महाव्यवस्थापक(भां.व.ख.)-सचिव | रु.१ कोटीपेक्षा जास्त (प्रती वस्तू प्रती वेळी) खरेदी मूल्य असलेल्या वस्तूंच्या मागविण्यात आलेल्या निविदेनुसार खरेदी प्रस्तावास मंजूरी देणे. | आवश्यकतेनुसार | नाही | उपलब्ध |
| २ | उपा.व व्यवस्थापकीय संचालक यांचेपर्यतची खातेनिहाय समिती | १) उपाध्यख व व्यवस्थापकीय संचालक-अध्यक्ष<br>२)वित्तिय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी-सल्लागार<br>३)महाव्यवस्थापक (यांत्रिकी)/उपभोक्ता खाते प्रमुख-सदस्य<br>४)महाव्यवस्थापक(भां.व ख.) - सदस्य<br>५)वरिष्ठ लेखा अधिकारी- सदस्य<br>६)वरिष्ठ भांडार अधिकारी- सचिव | रु.१० लाख ते रु.१ कोटीपर्यंत (प्रती वस्तू प्रती वेळी) खरेदी मूल्य असलेल्या वस्तूंच्या मागविण्यात आलेल्या निविदेनुसार खरेदी प्रस्तावास मंजूरी देणे. | -- | -- | -- |
| ३ | महाव्यवस्थापक (भां.व ख.) यांचे पर्यंतची खातेनिहाय समिती | १)महाव्यवस्थापक(भां.व ख.) - अध्यक्ष<br>२) )महाव्यवस्थापक (यांत्रिकी)/उपभोक्ता खाते प्रमुख-सदस्य<br>३) वरिष्ठ लेखा अधिकारी-सल्लागार<br>४)वरिष्ठ भांडार अधिकारी- सदस्य<br>५) भांडार अधिकारी /सहाय्यक भांडार अधिकारी- सचिव | रु.१० लाख पर्यंत (प्रती वस्तू प्रती वेळी) खरेदी मूल्य असलेल्या वस्तूंच्या मागविण्यात आलेल्या निविदेनुसार खरेदी प्रस्तावास मंजूरी देणे. | | | |

## १ स्थायी समितीची कार्ये :-

१) प्रवासी भाडे व टप्पे निश्चित करण्याच्या प्रश्नांचा विचार करणे व तसेच महामंडळाने याबाबत दिलेल्या आदेशांच्या आधारे टप्पे व भाडे निश्चिती अंतीम करणे.

२) बांधकाम करावयाच्या जागांसंबंधी प्रस्तावांचा विचार करणे व त्यांना अंतिम रुप देणे.

३) राज्य परिवहनाच्या विविध इमारतींच्या बांधकामाचा विचार करणे व त्या संबंधात आदेश देणे.

४) महाराष्ट्र राज्यात किंवा त्याबाहेर वाहतूक सेवेच्या विस्ताराचा विचार करणे व त्या हाती घेतांना अग्रक्रमाविषयी आदेश देणे.

५) राज्य परिवहन घटकाच्या कार्यालयाच्या अधिकारितेचा विचार करणे व त्यांच्या संबंधात आदेश देणे.

६) प्रशासनाच्या पुनर्रचनेचा विचार करणे व त्या संबंधातील प्रस्ताव महामंडळास सादर करणे.

७) भांडाराच्या मेळसंबंधी कामाचा अहवाल विचारात घेणे व त्यावर योग्य ते आदेश देणे.

८) महामंडळास सादर करावयाचे जे कामकाज इतर कोणत्याही समितीच्या कक्षेत येत नसेल असे सर्व कामकाज तपासणे.

९) खर्च अंतर्भूत असलेल्या प्रस्तावांची मुख्य लेखा अधिकाऱ्यांनी तपासणी केल्यावर महामंडळास सादर करण्यापूर्वी सर्व कामकाजावर आपल्या शिफारसी करणे.

१०) महामंडळाच्या निर्णयांच्या अंमलबजावणीवर सर्वसाधारण देखरेख ठेवणे.

११) महामंडळाने तिच्याकडे सोपवलेली असतील अशी कामे महामंडळाच्या वतीने पार पाडणे व तसे अधिकार चालविणे.

## २.निविदा व भांडार समिती :

**अध्यक्ष व कमाल ५ सदस्य नियुक्त करता येतात.**

निविदा व भांडार समितीची कार्ये :-

१) खालील बाबतीत निविदांची तपासणी करणे व स्वीकारणे.

(अ) भांडवली व महसूली भांडार आणि सामुग्री खरेदीच्या संदर्भातील.

(ब) संरचनात्मक व इतर बांधकामाच्या संबंधातील आणि महामंडळाने विहित केलेल्या मर्यादांच्या अधिन त्या स्विकारणे.

२) अतिरिक्त भांडाराची ज्या रितीने विल्हेवाट लावण्यांत यावी ती रीत ठरविणे व त्यांच्या विक्रीचे दर मान्य करणे.

## ३) उत्पादन, चालन आणि कर्मचारी कल्याण समिती

**अध्यक्ष व कमाल पांच सदस्य नियुक्त करता येतात.**

**उत्पादन, चालन आणि कर्मचारी कल्याण समितीची कार्ये :-**

१) आवश्यकतेच्या संबंधात निर्मिती क्षमतेसंबंधी योजना आणि त्याबाबत केलेल्या कामगिरीचे पुनर्विलोकन करणे.

२) वाहतूक सेवांचे पुनर्विलोकन आणि त्यांचे पुन:संघटन करण्याची काळजी घेणे. ज्यायोगे प्रवासी वाहतूक सेवा सुधारुन व जास्तीत जास्त उत्पन्न प्राप्त होईल.

३) अपहार व चोरटी वाहतूक यांना आळा घालण्यासाठी केलेल्या कार्यवाहीचे पुनर्विलोकन करणे.

४) खाद्यपेय व्यवस्थेसह प्रवासी सुखसोयी सुस्थितीत चालू ठेवण्याची काळजी घेणे.

५) कर्मचारी कल्याणाचा पुरस्कार करणा-या प्रस्तावांचा विचार करणे.

६) निर्मिती, कार्यचालन (वाहतूक) किवा कर्मचारी कल्याण यांच्याशी संबंधित इतर कोणत्याही बाबतीत विचार करणे.

७) कार्यशाळातील सोयीचे आधुनिकिकरण किंवा त्या वाढवण्याबाबत लागणा-या विशेषत: मोठया गुंतवणी संबंधीच्या प्रस्तावांची
तपासणी करण्याचे कार्य करुन अशा प्रकल्पासंबंधीच्या सर्व संबंधित व महत्वाच्या बाजूंचा उदा. गरज, अग्रक्रम, वार्षिक कामाचा बोजा, तसेच विद्यमान व भविष्यकालीन एकूण गुंतवणूक ,सध्याचा व संभाव्य उत्पादन खर्च, व्यावसायिक लाभ, आर्थिक व अर्थसंकल्पीय परिस्थिती, अगोदरचा बांधील खर्च, केलेल्या तांत्रिक छाननीचा तपशिल, (संबंध असेल तेथे) इतर
महामंडळाशी केलेली तुलना. अगोदर देण्यांत आलेल्या मंजुरीमध्ये वाढ करण्यासाठी समर्थन व अंमलबजावणीचा कार्यक्रम

अशा इत्यादी माहितीचा समावेश असलेला प्रस्ताव महामंडळाला सादर करणे.

**४) <u>सेवा मंडळ समिती :</u>** (अधिकारी व राज्यस्तरीय पदांच्या थेट भरतीकरिता)

१) वर्ग एक व वर्ग दोनची पदे ( मंजूर असलेल्या पदांसाठी ) थेट भरती सबंधी कामे

२) राज्य संवर्ग अंतर्गत येणा-या पदांसाठी सर्व विभागांमधील तृतीय व चतुर्थ वर्गाच्या पदाच्या थेट भरती सबंधी कामे.

३) उपनिवड समित्यांवर देखरेख ठेवणे.

४) रा.प. महामंडळाच्या आगार आणि विभागीय कार्यालयांसाठी घटक संवर्गातील (Unit Cadre) उमेदवारांची विभागवार निवड यादी तयार करण्यासाठी सेवामंडळाच्या उप निवड समित्यांची प्रदेशवार निर्मिती करण्यात येते.

**५) <u>लेखा परिक्षण उप समिती :</u>**

**सचिव** **:**मुख्य अतंर्गत लेखा परिक्षक

**६) <u>महामंडळ उपदान निधी उप समिती :</u>**

उपदान विषयकबाबींवर निर्णय घेणेसाठी

----------